गांवकरी

अकरावी प्रवेश : शेवटच्या दिवशी ६५ हजारांहून अधिक नोंदणी

एकूण १.४० लाख विद्यार्थ्यांचे ऑनलाइन अर्ज

नाशिक : प्रतिनिधी

अकरावी प्रवेशासाठी गुरुवारी (दि.५) नोंदणीचा शेवटचा दिवस होता. ऑनलाइन केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेअंतर्गत मुदतवाढ दिल्यानंतर संकेतस्थळाचे अद्यावतीकरण सुरू होते. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना अर्ज भरता आले नव्हते. गुरुवारी दुपारी दोन वाजेपर्यंत नोंदणीची अंतिम मुदत देण्यात आली होती. त्यानुसार नाशिक जिल्ह्यात ६५ हजार ७५१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून, ६० हजार ३३३ विद्यार्थ्यांनी भाग एक आणि दोन भरले आहे.

राज्याच्या शैक्षणिक टप्प्यातील महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या अकरावी प्रवेशप्रक्रियेला नाशिक विभागातील दि. ५ अखेर विभागातील एकूण १ लाख ४० हजार ८९७ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी पूर्ण केली आहे.

विभागातील जिल्हानिहाय आकडेवारीनुसार सर्वाधिक नोंदणी नाशिक जिल्ह्यात झाली असून, ६५,७५१ विद्यार्थ्यांनी अर्ज भरला आहे. यानंतर जळगाव जिल्हा ४१,०१९ नोंदणीसह दुसऱ्या क्रमांकावर असून, धुळे (१९,८६९) आणि नंदुरबार (१४,२५८) या जिल्ह्यांनीही चांगला प्रतिसाद दिला आहे.

प्रवेशप्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा असलेल्या भाग एक आणि भाग दोन फॉर्म लॉक करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही लक्षणीय आहे.

एकूण नोंदणीपैकी १,३७,७९७ विद्यार्थ्यांनी भाग दोन लॉक केले आहे, तर १,३८,६७३ विद्यार्थ्यांनी प्रवेश शुल्क भरणा पूर्ण केला आहे. जिल्ह्यात एकूण ८७ हजार ६५३ विद्यार्थी दहावीत उत्तीर्ण झाले असून, अकरावीच्या ८९ हजार १६० जागा उपलब्ध आहेत.

जिल्हानिहाय

नाशिक : नोंदणी - ६५ हजार ७५१

भाग एक	-	६४ हजार २१८
भाग दोन	-	६० हजार ३३३

जळगाव - नोंदणी ४१ हजार ०१९

भाग एक	-	४० हजार १८७
भाग दोन	-	३८ हजार ३०२

धुळे : नोंदणी-१९ हजार ८६९

भाग एक	-	१९ हजार ४४८
भाग दोन	-	१८ हजार ४७६

नंदुरबार : नोंदणी -१४ हजार २५८

भाग एक	-	१३ हजार ९४४
भाग दोन	-	१३ हजार १३१

राज्यभरात २० लाखांहून अधिक प्रवेशक्षमता

नाशिक : प्रतिनिधी

राज्यातील इयत्ता ११ वीच्या केंद्रीय ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी राज्यभरातील एकूण २० लाख ४३ हजार २५४ जागांची प्रवेशक्षमता कला, वाणिज्य व विज्ञान शाखांमध्ये असून, कला शाखा ६ लाख ५० हजार ६८२, वाणिज्य शाखा : ५ लाख ४० हजार ३१२, विज्ञान शाखा : ८ लाख ५२ हजार २०६ जागांसाठी प्रवेश होणार आहेत.

जे विद्यार्थी कॅप राउंड किंवा कोटामार्फत (व्यवस्थापन/ इन- हाऊस/ अल्पसंख्याक) प्रवेश निश्चित करतात, त्यांचा प्रवेश अंतिम समजला जाईल. एकदा प्रवेश घेतल्यानंतर उमेदवाराचा प्रवेश निश्चित मानण्यात येईल. सर्व प्रकारचे नोंदणी शुल्क डिजिटल माध्यमातून स्वीकारले जातील. व्यवस्थापन, इन-हाऊस आणि अल्पसंख्याक कोटा प्रवेश ६ जून २०२५ पासून सुरू होतील. सर्व विद्यार्थ्यांनी प्रवेश वेळापत्रकाचे काटेकोर पालन करणे अत्यावश्यक आहे.

अधिक माहितीसाठी : संकेतस्थळ : www.mahafyjcadmissions.in, ई-मेल : supportmahafyjcadmissions.in संपर्क करण्याचे आवाहन संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय डॉ. महेश पालकर यांनी केले आहे.

राज्यातील महत्त्वाच्या विभागनिहाय एकूण प्रवेशक्षमता

विभाग	एकूण क्षमता	कला	वाणिज्य	विज्ञान
अमरावती	१,८६,४७५	८०,७४०	२४,३४०	८१,३९५
छ. संभाजीनगर	२,६६,७५०	१,११,१६५	४२,६१५	११२,६७०
कोल्हापूर	१,९३,२७८	६४,५७२	४८,४६६	८०,२४०
लातूर	१,३७,५५०	५२,८६०	२१,२६०	६३,४३०
मुंबई	४,६१,६४०	२२,९५५	२,७२,९३०	१,६०,७१५
नागपूर	२,१४,३९५	७६,३९५	३८,८३०	९९,८७०
नाशिक	२,०७,३२०	८३,०००	३७,०२०	८६,७३०
पुणे	३,७५,८४६	१,०३,७०५	१,०१,९७१	१,७०,१७०

बिटको हॉस्पिटलमध्ये पोलीस व वैद्यकीय अधिकाऱ्यांशी गैरवर्तन; चार जणांवर गुन्हा दाखल

सिडको : विशेष प्रतिनिधी :

नाशिकरोड येथील बिटको हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी आलेल्या इसमांसोबत आलेल्या चार जणांनी पोलीस व वैद्यकीय अधिकाऱ्यांशी गैरवर्तन करत धक्काबुक्की आणि शिवीगाळ केल्याची घटना घडली आहे. या प्रकारामुळे वैद्यकीय अधिकारी आणि सुरक्षा कर्मचारी यांच्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, पोलीस ठाण्यात संबंधित चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी पोलीस शिपाई योगेश भगरे (नेमणूक - पोलीस मुख्यालय, नाशिक शहर) हे दि. ३ जून २०२५ रोजी रात्री ११.४० वा. बिटको हॉस्पिटल येथे कर्तव्यावर होते. त्यावेळी वैद्यकीय अधिकाऱ्यांशी वैभव डोळस, अर्पित रतन साळवे, जय कुमावत, किरण मंगेश कुमावत (महिला) (सर्व रा. सुंदरनगर, उपनगर) यांनी वाद घालत धक्काबुक्की केली. फिर्यादी व पोलीस कर्मचारी पोहवा पाटील यांनी प्रकार शांत करण्याचा प्रयत्न केला असता, आरोपींनी त्यांच्यावर तसेच सिक्युरिटी गार्ड व गुन्हे शोध पथकातील अंमलदारांवरही शिवीगाळ व धक्काबुक्की केली. सरकारी सेवकाच्या कर्तव्यात अडथळा निर्माण केल्याबद्दल त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग नाशिक
WEBSITE: https//mahatenders.gov.in
दरपत्रक सूचना क्रमांक २ सन २०२५ २०२६

कार्यकारी अभियंता, सा. बां. (आदिवासी) विभाग नाशिक (दूरध्वनी क्रमांक ०२५३२९९२०५३) हे आदिवासी विकास विभागांतर्गत बांधकाम व्यवस्थापन कक्षा मार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांसाठी संगणकीकरणाची अंदाजपत्रके तयार करण्यासाठी, दर पत्रकाव्दारे नामांकित पुरवठादार यांचेकडून खालीलप्रमाणे दर मागवित आहेत. दरपत्रक सादर करण्याचा कालावधी **दिनांक ०६/०६/२०२५ वेळ १०.०० पासून ते दिनांक १३/०६/२०२५ वेळ १७.५५ पर्यंत** असा आहे. तरी पुरवठादार यांनी त्यांचे सिलबंद दर हे **दिनांक १३/०६/२०२५** रोजी कार्यालयीन वेळे आधी पोहचतील अशा पध्दतीने सादर करण्यात यावे.

ई निविदा काम क्रमांक	तपशील
१	आदिवासी विकास विभागांतर्गत बांधकाम व्यवस्थापन कक्षामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांसाठी संगणकीकरण करणे.

Note:- Rate should be quoted as per BOQ Attached

सर्व पात्र/इच्छुक पुरवठादारांनी आपले अटी व शर्ती विरहीत दरपत्रक कार्यालयात विहित वेळेत सादर करावेत. एक किंवा सर्व दरपत्रके नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवलेला आहे.

जा.क्र. लेखा/निविदा/१९८३६/सन २०२५
कार्यकारी अभियंता, सा. बां. (आदिवासी) विभाग नाशिक जि. नाशिक यांचे कार्यालय
दिनांक :- ०४/०६/२०२५

सही/-
कार्यकारी अभियंता
सा. बां. (आदिवासी) विभाग
नाशिक

आरओसी-2025-26/क्र-5/C१०१०

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त गिरगाव चौपाटीवर प्लास्टिक निर्मूलन मोहीम

मुंबई :

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत गिरगाव चौपाटी येथे एकल प्लास्टिक निर्मूलन मोहीम राबविण्यात आली. वसुंधरेच्या संरक्षणासाठी पर्यावरण विभागाने पाऊले उचलली असून, नागरिकांनी एकल वापराच्या प्लास्टिकचा वापर टाळण्याचे आवाहन मंत्री श्रीमती मुंडे यांनी यावेळी केले.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, बृहन्मुंबई महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने गिरगाव चौपाटी येथे एकल प्लास्टिक निर्मूलन मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, सदस्य सचिव डॉ. अविनाश ढाकणे यांच्यासह विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी, महापालिकेचे स्वच्छता कर्मचारी व सामान्य नागरिक उपस्थित होते.

यावेळी मंत्री श्रीमती मुंडे व श्री. कदम यांनी गिरगाव चौपाटीची पाहणी करून या ठिकाणी कशा प्रकारे स्वच्छता केली जाते याची माहिती घेतली. तसेच त्यांनी स्वच्छता कर्मचाऱ्यांबरोबर स्वच्छताही केली. मंत्री श्रीमती मुंडे म्हणाल्या की, पर्यावरण व वातावरणीय बदल आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्यावतीने राज्यात २२ मेपासून एकल वापर प्लास्टिक मुक्तीसाठी मोहीम राबविण्यात येत आहे. एकल वापर प्लास्टिकला नाही म्हणायचे असून त्याचा वापर पूर्णपणे बंद करायचे आहे. त्या प्लास्टिकचा पुनर्वापर कसा करायचा, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. यासाठी विविध ट्रस्टचा सहभाग घेत आहोत. विविध धार्मिक स्थळ, रुग्णालये, औषधांची दुकाने आदी विविध ठिकाणी प्लास्टिकचा वापर रोखण्यासाठी जनजागृती करत आहोत.

झाडे लावून ती जतन करा, प्लास्टिकचा वापर करणे टाळा, पाण्याची बचत करा, सौरऊर्जा, सायकल वापरणे यांसारख्या पर्यावरणपूरक पर्यायांची निवड करा, कापडी पिशव्या वापरा याबाबत जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमात विविध संस्थांनी पथनाट्याद्वारे एकल वापराच्या प्लास्टिक बंदीसंदर्भात जनजागृती केली. यावेळी मुक्ताई घनकचरा व्यवस्थापन सेवा संस्था या संस्थेचे सदस्य तसेच जोशी-बेडेकर महाविद्यालयासह विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी एकल वापराच्या प्लास्टिकविरुद्ध घोषवाक्याद्वारे जनजागृती केली व चौपाटीतील कचरा स्वच्छ करून स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले.

शहापूर नगरपंचायत,शहापूर. जि. ठाणे.
कार्यालय दूरध्वनी क्र :- ०२५२७-२७२१८७
इ-मेल:shahapurnagarpanchayat@gmail.com/coud.shahapur@maharashtra.gov.in
जा.क्र.श.न.प/जाहिरात/पा.पु.वि./४७१/२०२५ **दिनांक :-**०५/०६/२०२५

जाहीर सूचना

शहापूर नगरपंचायतमार्फत खालील कामांकरिता संबंधित नोंदणीकृत/अधिकृत ठेकेदारांकडून लिफाफा पद्धतीने निविदा दि.०६/०६/२०२५ रोजी पासून ते दि. १८/०६/२०२५ दुपारी ४.०० वा. पर्यंत मागविण्यात येत आहे.

मुदतीत आलेल्या निविदांचे लिफाफे शक्य झाल्यास मुख्याधिकारी यांच्या कार्यालयात निविदाधारक अथवा त्यांच्या प्रतिनिधी समक्ष दि.१९/०६/२०२५ रोजी सकाळी ११.३० वा. किंवा कार्यालयीन सोईनुसार उघडण्यात येतील. सदर निविदांबाबत कोणतेही कारण न देता एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार नगर पंचायतीने राखून ठेवला आहे. अधिक माहितीसाठी शहापूर नगरपंचायत, कार्यालयात संबधित विभागाशी संपर्क साधावा.

अ. क्र	विभागाचे नाव	कामाचे नाव	अनामत रक्कम	निविदा फॉर्म फी
१	पाणी पुरवठा	शहापूर नगरपंचायत पाणी पुरवठा योजने वरील Overhauling and Servicing of pumps and motor at 2 MLD WTP at Shahap हे काम करणे	७३८३/-	५००/-
२	पाणी पुरवठा	शहापूर नगरपंचायत पाणी पुरवठा योजने वरील SITC of Voltage Stabilizer APFC Panel at Sapgaon Jackwell and SITC of Submersible Pumps at Chaitraban well हे काम करणे	९९८६/-	५००/-

सही/-
(शिवराज विठ्ठलराव गायकवाड)
मुख्याधिकारी
शहापूर नगरपंचायत, शहापूर

MAHAGENCO Maharashtra State Power Generation Co. Ltd.

E-Tender Notice

Chandrapur Super Thermal Power Station MAHAGENCO, invites bid offers from reputed and experienced Companies to Participate in the Competitive bidding Process to following O&M Tenders.

S. N.	Tender NO (Rfx No) / Descricption / Estimated Cost in Rs.
1	IC-II / Rfx No. 3000058300 / Work contract for Removal, servicing, repair and Restoration of BAH, HAG, Burner Tilt (BT) Large size Pneumatic power cylinders during AOH of Unit-5 / Rs.217248/-
2	TEST-II / Rfx No. 3000058368 / Work contract for Testing of Generator & Switchgear Protection relays of Unit-5 during Unit Overhaul period / Rs.1657000/-
3	IC-III / Rfx No. 3000058350 / Procurement of various types of Solenoid valves and their spares of AHP of C&I-III, Unit-8&9, CSTPS, Chandrapur / Rs.2105333/-
4	IC-III / Rfx No. 3000058361 / Procurement of power cylinders & power cylinder seals for Ash Handling Plant for C&I-III, Unit-8&9, CSTPS, Chandrapur / Rs.1980395/-
5	CHP-D / Rfx No. 3000058261 / Annual contract for the work of engaging Earth moving equipment for coal stock management at CHP-D, CSTPS, Chandrapur for 2 years / Rs.11885127.26/-
6	CHP-D / Rfx No. 3000058378 / Work of Ceramic tiles direct bonding on conveyor pulleys without rubber sheet/rubber pad for conveyor system in CHP-D, CSTPS / Rs.1705014/-
7	CHP-B / Rfx No. 3000058374 (Refloated) / Procurement of Counter Shafts for Apron feeder, Jack Shaft, Driven V Belt Pulley for Crusher for CHP B, CSTPS / Rs.1168100/-
8	TM-I / Rfx No. 3000058373 / Work of repairing and internal inspection of Deaerator tray, FST & replacement of LP heater -1 during Unit-4 AOH, CSTPS, Chandrapur / Rs.1176264.12/-
9	TM-I / Rfx No. 3000058387 / Work of IN-SITU repairing and servicing of various High-pressure valves at Unit-4, 210MW, CSTPS, Chandrapur / Rs.2449102/-
10	TM-I / Rfx No. 3000058388 / Work of cleaning of various coolers during Annual Overhaul Unit-4, CSTPS, Chandrapur / Rs.875263.37/-

Above floated tender published in MAHAGENCO online Portal. For the detailed Tender document, interested bidders should visit SRM Website **https://eprocurement.mahagenco.in for (Sr. No. 01 to 10)** For any query Contact No. 8554991818.

Sd/-
CHIEF ENGINEER (O&M)
CSTPS, CHANDRAPUR

निवृत्तिनाथांच्या पालखीचे १० जूनला प्रस्थान

नाशिक : प्रतिनिधी

संतश्रेष्ठ निवृत्तिनाथ महाराज यांचा आषाढी पालखी सोहळा पंढरपूरकडे मंगळवारी (दि. १० जून) श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे.

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर निवृत्तिनाथ संस्थानने तयारी पूर्ण केली असून, वारकऱ्यांसाठी लागणाऱ्या वेगवेगळ्या मूलभूत सुविधा पाणी, पालखी तळांवरील निवासाची व्यवस्था, शौचालय आदींची व्यवस्था करण्यात आलेली आहे. पालखी सोहळ्याचा पहिला मुक्काम पेगलवाडी येथील महानिर्वाणी आखाड्यात होणार आहे. परंपरेप्रमाणे त्र्यंबकेश्वर येथून विधिवत पूजा करून संतश्रेष्ठ निवृत्तिनाथांच्या पादुका चांदीच्या रथात विराजमान होतील. प्रस्थानाच्या मिरवणुकीनंतर टाळ-मृदंगाच्या गजरात श्रींचे रथातून पंढरपूरकडे प्रस्थान होईल. याबाबत संस्थानचे अध्यक्ष ॲड. सोमनाथ घोटेकर यांनी सांगितले की, पालखी सोहळा हा अत्यंत वैभवशाली आणि परंपरेप्रमाणे होत आहे. वारकऱ्यांना हव्या असणाऱ्या मूलभूत सुविधा निर्माण करून दिल्या आहेत. मागच्या वर्षीच्या तुलनेत यंदा पालखी सोहळ्यात काही नवीन दिंड्या सहभागी होणार आहेत. मात्र, वारी मार्गामध्ये त्या निवृत्तिनाथांच्या सोहळ्यात सहभागी होतील.

पंढरपूरपर्यंत यंदा तीन बैलजोड्या रथासाठी असून, साधारणतः ३० हजार वारकरी पालखी सोहळ्यासोबत चालणार आहेत. पुढे अहिल्यानगरीतून यात वाढ होणार असून, पंढरपूरपर्यंत एक लाख वारकरी निवृत्तिनाथांच्या रथासोबत चालतील. यंदा दिंडी मार्गावरील गावांतील ग्रामपंचायतींना लागवडीसाठी पाच वृक्ष देण्यात येणार असून, त्यातून हरित वारीचा संकल्प पूर्ण होणार आहे. या झाडांसाठी सामाजिक संस्थांनी योगदान देऊन रोपे उपलब्ध करून दिले आहेत.

महानिर्मिती महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

ई-निविदा सुचना

अ. क्र.	ई-निविदा क्रमांक	ई-निविदा तपशील	अंदाजपत्रकाची किंमत	निविदा शुल्क/ बयाणा रक्कम
१	३०००० ५८३५५	भिरा आणि तिलारी जल विद्युत केंद्र येथे नवीन/जुन्या स्ट्रक्चरल स्टील च्या कामाला तीन थरांमध्ये ग्राफ्ट को-पॉलिमर तंत्रज्ञानावर आधारित थर्मोप्लास्टिक, इलास्टोमेरिक अँटी-कॉरोसिव्ह कोटिंग प्रदान करणे आणि लागू करणे.	रु. ३९,४०,००५ /-	रु. १,१८०/- रु. ४२,९००/-
२	३०००० ५८२८०	भिरा, तिलारी, पवना जल विद्युत केंद्र येथे एअर कॉम्प्रेसर व त्याच्या सर्व अक्सेसरीजचा चा पुरवठा व कार्यान्वित करणे.	रु. ३६,६०,०००/-	रु. १,१८०/- रु. ४०,१००/-

निविदा विक्री कालावधी व सादर करण्याची अंतिम तारीख: ०६.०६.२०२५ (स. ११:००वा.) पासून ते २६.०६.२०२५ (सायं.५:०० वा.) पर्यंत.

अधिक माहितीकरता आमच्या https://eprocurement.mahagenco.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.

संपर्क :
अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय
नवीकरणीय ऊर्जा मंडळ, पुणे
प्लॉटक्र. १०६, प्रकाश भवन, ५ वा मजला, सेनापती बापट मार्ग, पुणे – ४११ ०१६.
ई-मेल- segenpune@mahagenco.in
संपर्क – ७७६७८७८२५५,९६७३८९८७७७

अधीक्षक अभियंता
नवीकरणीय ऊर्जा मंडळ, पुणे

राष्ट्र सेवा दलातर्फे पाच दिवस उन्हाळी शिबिराचे आयोजन

मालेगाव : प्रतिनिधी

येथील राष्ट्र सेवा दलातर्फे ६ ते १० जून अशा पाच दिवसांचे उन्हाळी शिबिर आयोजित करण्यात आले असल्याची माहिती शिबिर संयोजक नचिकेत कोळपकर यांनी दिली.

मुला-मुलींसाठी खास उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात १० ते १६ वयोगटातील विद्यार्थी सहभागी होऊ शकतील. शिबिराचे कॅम्प येथील रेवा बाग येथे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी सात ते सायंकाळी सहा या वेळेत होणा÷या शिबिरात योगासने, कॅलिस्थानी नृत्य, ॲरोबिक्स, ओरिगामी, मनोरंजनात्मक खेळ, गाणी, बुद्धिबळ प्रशिक्षण, शॉर्ट फिल्म तयार करण्याचे तंत्र, वैचारिक सुसंवाद, तंत्रज्ञान व कोडींग, जादूचे प्रयोग, अंधश्रद्धा निर्मूलन, वैज्ञानिक दृष्टिकोन, पर्यावरण व विज्ञानावर आधारित माहिती आणि चित्रकला यांचा समावेश आहे. या पाच दिवसात वेगवेगळ्या विषयांवर २५ तज्ञ व्यक्तींना शिबिरासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. या शिबिरासाठी मुख्य प्रशिक्षक म्हणून शुभम चौगुले, प्रज्वल घुमरे तर सहाय्यक प्रशिक्षक गीता जोशी, पुजा पाठक, कपिल कनौज, विष्णू गुमाडे, यशवंत जाधव, प्रतिक्षा सूर्यवंशी, निशा पवार आदी नियोजन पाहणार आहेत. विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर नोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. प्रथम येणाऱ्यास प्रवेश या तत्त्वावर प्रवेश दिले जाणार असल्याचे राष्ट्र सेवा दल तालुकाध्यक्ष राजेंद्र दिघे, संघटक बळवंत अहिरे, मोरेश्वर जोशी, कोषाध्यक्ष राजीव वडगे यांनी सांगितले.

येवला नगरपरिषद, येवला, जिल्हा नाशिक

जाहीर सूचना

(महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम, १९६५ अंतर्गत)

दिनांक:०५/०६/२०२५

विषय: बकरी ईद (ईद-उल-अजहा) निमित्त
येवला शहरातील नागरिकांना मार्गदर्शक सूचना

सर्व येवला शहरातील नागरिकांना सूचित करण्यात येते की, येणाऱ्या बकरी ईद (ईद-उल-अजहा) सणाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम, १९६५ मधील कलम २२३, २२४, व २३१ नुसार सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता, शांतता व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने खालील सूचना जारी करण्यात येत आहेत:

१. जनावरांची कत्तल ही केवळ नगरपालिकाने सूचित केलेल्या जागेवरच करण्यास अनुमती आहे.
२. सार्वजनिक रस्ते, गल्ली, खुली मैदाने किंवा अन्य सार्वजनिक ठिकाणी कत्तल करणे कायद्यानुसार प्रतिबंधित आहे.
३. जनावरांच्या अवशेष व कचरा उघड्यावर न टाकता नगरपरिषदेच्या कचरा संकलन यंत्रणेद्वारे उचलून नेण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.
४. ध्वनीप्रदूषण (डीजे मोठ्या आवाजाचे स्पीकर) नियंत्रणात ठेवण्यात यावे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करावे.
५. सण काळात शांतता, कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे.
६. सार्वजनिक आरोग्य धोक्यात येईल अशी कोणतीही कृती करू नये. यासाठी कलम २३१ अंतर्गत कारवाई केली जाईल.
७. नगरपरिषदेच्या मा. मुख्याधिकारी यांनी दिलेल्या सूचनांचे पालन बंधनकारक राहील.
८. येवला शहारातील दोन्ही इदगाह ठिकाण लककडकोट व वलीबाबा इदगाह कोर्ट रोड येथे आपल्यामर्फत पाळीव जनावरे, डुक्कर, इदगाह येथे आढळून आल्यास संबंधित जनावरे मालक यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

वरील सूचनांचे उल्लंघन करणाऱ्यांवर महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम, १९६५ अंतर्गत आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल. सर्व नागरिकांनी बकरी ईद शांततेत, स्वच्छतेने व सौहार्दपूर्ण वातावरणात साजरी करावी, ही नम्र विनंती.

सही/-
मुख्याधिकारी
येवला नगरपरिषद, येवला

ADITYA BIRLA CAPITAL PROTECTING INVESTING FINANCING ADVISING

आदित्य बिर्ला फायनान्स लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय- इंडियन रेयॉन कंपाऊंड, वेरावल, गुजरात-३६२२६६.
कॉर्पोरेट ऑफिस: १२ वा मजला, आर टेक पार्क, निरलॉन कॉम्प्लेक्स, हब मॉलजवळ, गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०००६३. महा.

ई लिलाव नोटीस

SARFAESI ACT 2002 (कायदा) व सुरक्षित व्याज (सक्त वसुली) नियम २००२ च्या नियम ९ (१) अन्वये स्थावर मालमत्ता लिलावाव्दारे विक्री करण्यासाठी १५ दिवसाच्या मुदतीची ही लिलाव सूचना (नोटीस) राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण- अहमदाबाद यांनी २४-०३-२०२५ च्या आदेशामध्ये स्वीकृती निर्दिष्ट केलेली आदित्य बिर्ला फायनान्स लि. व आदित्य बिर्ला कॅपिटल लि. च्या ११.०३.२०२४ रोजी प्रस्तावित एकत्रीकरण योजनेस मान्यता दिलेली आहे. त्या आदेशानुसार **आदित्य बिर्ला फायनान्स लि.** यांनी सुरु केलेल्या **SARFAESI** कायदा अंतर्गत सर्व कारवाईचे सुरक्षित-गहाण दिलेल्या मिळकतीचे कामकाज एकत्रीकरणानंतर मे.आदित्य बिर्ला कॅपिटल लि. या कंपनीकडे वर्ग झालेले आहे. आदित्य बिर्ला कॅपिटल लि./सुरक्षित धनको यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी पुढील सुरक्षित मालमत्तांच्या कायद्यांच्या कलम १३/२ प्रमाणे त्यावरील कर्जदारांच्या येणे बाकी वसुलीसाठी ताबा घेतलेला आहे. पुढील तक्त्याप्रमाणे असलेली येणेरक्कम व पुढील खर्च/चार्जेस सह वसुलीसाठी सर्वसामान्य जनतेस व विशेषत: कर्जदार/सहकर्जदार यांना या सूचनेव्दारे (नोटीस) कळविण्यात येते की, वसुलीसाठी त्यामध्ये दर्शविलेल्या तारीख व वेळेस ई लिलावाव्दारे तिची ''जशी आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे आहे'', व ''जे काही आहे'' या तत्वावर विक्री करण्यात येणार आहे.

ई लिलावाची तारीख व वेळ : २४/०६/२०२५ स. ११ ते दु. १ वाजेपर्यंत
केवायसी व बयाणा रक्कम मिळवायची शेवटची तारीख : २३/०६/२०२५

अ. क्र.	कर्जदार व सहकर्जदारांचे नाव	मालमत्तेचे वर्णन	राखीव किंमत	बयाणा रक्कम व बोलीवाढ	मागणी सूचना तारीख व एकूण येणे रक्कम
१	**१. मे. केशव डेअरी फार्म केशव नामदेव आहेर यांचे व्दारे २. श्री. केशव नामदेव आहेर, नामदेव रघुनाथ आहेर यांचे पुत्र ३. सौ. मनिषा नामदेव आहेर श्री.सुरेश जाधव यांच्या पत्नी ४. श्री. नामदेव रघुनाथ आहेर रघुनाथ भिवसन आहेर यांचे पुत्र कर्जदार खाते क्र. ABNSKSTS 000000571788**	गाव नाशिक, तालुका व जि. नाशिक येथील नाशिक मनपा क्षेत्रातील सिटी सर्व्हे क्र.५४५७ बी क्षेत्र २२०.७४ चौ.मि. व सिटी सर्व्हे क्र.५४५७ डी क्षेत्र ७०.२० चौ. मि.एकूण क्षेत्र २९०.९४ चौ.मी. वर बांधलेल्या 'सोनाली प्लाझा' योजनेतील दुकान क्र.३ त्याचे चटई क्षेत्र १६.६५ चौ.मि. व दुकान क्र.४ त्याचे चटई क्षेत्र १२.७३ चौ.मि. त्यांची चतु:सीमा दुकान क्र.३: उत्तरेस- लिफ्ट. जिना. स्वच्छतागृह, दक्षिणेस- मोकळी जागा, पूर्वेस- दुकान क्र.४, पश्चिमेस- दुकान क्र.२ दुकान क्र.४: उत्तरेस- पार्किंग जागा, दक्षिणेस-पार्किंग जागा, पूर्वेस-पार्किंग जागा, पश्चिमेस- दुकान क्र.३	४९,६०,०००/- (एकोणपन्नास लाख साठ हजार रुपये मात्र)	४,९६,०००/- (चार लाख शहाण्णव हजार हजार मात्र) २५,०००/- (पंचवीस हजार मात्र)	१३.०६.२०२४ रु. ६१,५९,३२१.२०/- (एकसष्ट लाख एकोणसाठ हजार तीनशे एकवीस व वीस पैसे मात्र) १२.०६.२०२४ पर्यंत

विक्रीच्या तपशिलवार अटी व शर्तीसाठी आदित्य बिर्ला फायनान्स लि. च्या वेबसाईटवरील सुरक्षित धनको येथील लिंक वरून संपर्क करावा.: **Aditya Birla Capital Limited/Securted Creditor's Website i.e.https://abfl. adityabirlacapital.com/page/Individual/Properties-for-Auction-under-SARFAESI-Act. aspx or https://BidDeal.in** संपर्क क्र. : प्राधिकृत अधिकारी, आदित्य बिर्ला फायनान्स लि. **१.अपूर्व थॉमस दांथी-apoorva.danthi@adityabirlacapital.com** मो.नं. ९९३०९०९७२५. आपण नजीकच्या शाखेशी संपर्क करू शकता. **२. मोहीत शर्मा: mohit.sharma@adityabirlacapital.com** मो.नं. ९८७३९१३९५५. **३. जहीरउल लस्कर,** मो. ९७०६००३०७५ **४. परणीत सिंघ,** मो. ९७२००२९३३७ **५. श्री.राजेश विरकर**, मो. ७३९७९३०२०२

स्थळ: नाशिक, महाराष्ट्र
तारीख: ०६/०६/२०२५

सही/-
अधिकृत अधिकारी
आदित्य बिर्ला फायनान्स लि.